Shri Shivaji Education Society's Amravati

# MAHATMA FULE ARTS, COMMERCE AND SITARAMJI CHAUDHARI SCIENCE MAHAVIDYALAYA, WARUD

## KNOWLEDGE RESOURCE CENTRE (LIBRARY)

## Activity of Library Department From (30/04/2024 To 31/05/2025)

1) Date12/08/2024: On the Occasion of Dr. S. R. Ranganathan Birth anniversary organized Book Exhibition in reading Hall. Book exhibition inaugurated b the hands of Hon'ble principal Dr. D.V. Hande at the time of this event all students, teachers, and non-teaching staff visited to this programme.
2) 15/10/2024: On the Occasion of Dr. A. P.J. Abdul Kalam Birth anniversary organized Poster Competition of quote explanation and biography of Padamashree Dr. A.P.J. Abdul in reading hall. many students participated in this competition. Three students were awarded to prize and participation certificates are distributed to other all students.
3) Date: - 30/12/2024 To 15/01/2025, Under the initiative of "Wachan Sankalp Maharashtracha" Organized book Exhibition in reading hall. many students, teacher and non-teaching staff was visited to book exhibition.
4) Date: -01/01/2025: -Under the initiative of "Wachan Sankalp Maharashtracha" organized Samuhik wachan and Reading Skill workshop.
5) on January 14, 2025. Book Review and writer-reader dialogue program, the program was chaired by Dr. Chandu Pakhare, Head of the Marathi Department. He told the students the importance of reading through his guidance. The chief guests of the program and writer, guide Dr. Karuna Ande, Marathi Department, Dr. Shubhangi Sonar, Political Science Department, and Prof. L.S. Pawar, committee members were present. How to review a book in this. Only if everyone reads can reading be competent, from the perspective of developing linguistic skills in students and to develop reading skills, Dr. Karuna Ande guided the students. In the writer-reader dialogue program, Dr. Shubhangi Sonar explained that reading helps a person to mature socially, emotionally and mentally. Also, an essay writing competition of at least 500

words has been organized in the writer-student reading dialogue, and book review and narration competition, reading a book and writing a book on it. The best essays will be awarded prizes and all the other participating competitors will be given incentive certificates.

**1) Date: -** 12/08/2024: On the Occasion of Dr.S.R.Ranganathan Birth anniversary organized Book Exhibition in reading hall. Inaugurated by the hands of Hon'ble Dr. D.V. Hande (Principal). This exhibition participated many more students, teachers, and non-teaching staff.









9) Date: -15/10/2024: On the Occasion of Dr. A. P.J. Abdul Kalam Birth anniversary organized Poster Completion of quote explanation and biography of Padamashree Dr. A.P.J. Abdul in reading hall.






अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, पाच स्वतंत्र आवृत्त्या

सुविचार
जो आपल्या पाठीमागे ठिकाण न करता, आपल्या तोंडावर टीका करतो तोच खरा मित्र.

संपादक- अनिल अग्रवाल

# मातृभूमि

संस्थापक : स्व. ब्रजलालजी बियाणी

अमरावती

९० वर्ष जुनं ते सोनं

मो.9284243442
मो.9422918686

RNI : MAHMAR/2010/35500
Postal. No. ATI/RNP/291/17-19

● रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४ ● किंमत –४.०० रु. ● पाने १२

FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI


नाना पटोले आणि संजय राउतमधील वाद मिटला?
सविस्तर वृत्त आतील पानावर

## महात्मा फुले महाविद्यालयात ग्रंथालय विभागातर्फे वाचन प्रेरणा दिन

**ता.प्रतिनिधी। १९ ऑक्टोबर**

**वरुड –** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणुन नुकतेच संपन्न झाले.


कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसुर्य महात्मा फुले व शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख, भारतरत्न मिसाईल मॅन माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला आदरांजली वाहुन करण्यात आली. माझा जन्म दिवस हा विद्यार्थ्यांनी 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणुन साजरा करण्यात यावा, अशी इच्छा ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले.



या निमित्ताने ग्रंथालय विभागाच्या वतीने सुविचार पोस्टर्स प्रदर्शनी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम मोनाली पोटे, द्वितीय राहिला पी.खान, तृतीय भाग्यश्री सलामे तर बाकी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे परीक्षण प्रा.माधुरी उमेकर, डॉ.संजय सातपुते, डॉ.चतुर्भुज कदम यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सातपुते तसेच तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.सुनील काळमेघ, मराठी विभागातील प्रा.लक्ष्मण पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल सुधाकर घोरपडे, सहा. ग्रंथपाल संदीप मांडवे, ग्रंथालय लिपिक आशिष घोरपडे, ग्रंथालय परिचर त्र्यंबक सुरजुसे, दुर्गा परिसॅ आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



6) Date: -30/12/2024 To 01/01/2025 On the Occasion of Wachan Pandharwada “Wachan Sankalp Maharashtracha” organized book exhibition in reading hall. Inaugurated by the hands of Hon’ble Dr. D.V. Hande (Principal). This exhibition participated many more students, teachers, and non-teaching staff.










7) Date: -31/12/2024 On the Initiative of Wachan Pandharwada "Wachan Sankalp Maharashtracha" organized book exhibition in reading hall. Inaugurated by the hands of Hon'ble Dr. D.V. Hande (Principal). This exhibition participated many more students, teachers, and non-teaching staff.












8) Date: -01/01/2025 On the Initiative of Wachan Pandharwada “Wachan Sankalp Maharashtracha” organized Samuhik Wachan and reading skill workshop. In this programme many more students, teachers were participated.













On 26th January 2025, Hon. Dr. D.V. Hande (Principal) released the book reading booklet.






On 26th January 2025, Hon. Dr. D.V. Hande (Principal) distributed the prizes for the essay competition.



श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित

# महात्मा फुले कला ,वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय , वरुड जि. अमरावती

**नेक बी श्रेणी नामांकन प्राप्त**

**"वाचन संकल्प महाराष्ट्राचा " (वाचन पंधरवडा)**

# ग्रंथ वाचन पुस्तिका

**ग्रंथालय विभाग**



**-: प्रकाशक :-**

**प्राचार्य**

**महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड जि. अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

**महात्मा फुले कला , वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय ,वरुड जि. अमरावती**

**ग्रंथालय विभाग**

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

**(वाचन पंधरवाडा)**

# ग्रंथ वाचन पुस्तिका

**दिनांक ०१ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५**

**प्रकाशक**

**प्राचार्य**

**महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान**

**महाविद्यालय, वरुड जि. अमरावती**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" (प्रास्ताविक) | ४-६ |
| २ | ग्रंथप्रदर्शनीचे उदघाटन व सहभागी विद्यार्थी | ७-९ |
| ३ | दैनिक मातृभूमी वृत्तपत्र जाहिरात | १० |
| ४ | वाचन कौश्यल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन | ११-१२ |
| ५ | दैनिक मातृभूमी वृत्तपत्र जाहिरात | १३ |
| ६ | लेखक - वाचक परीसंवाद व सहभागी विद्यार्थी | १४- |
| ७ | पुस्तक परीक्षण व निबंध लेखन स्पर्धा फोटोग्राफ | १५-१६ |
| ८ | दैनिक मातृभूमी वृत्तपत्र जाहिरात दिनांक 20 जानेवारी २०२५ | १७ |
| ९ | दैनिक वृत्तपत्र वरुड दर्पण जाहिरात दिनांक 20 जानेवारी २०२५ | १८ |
| १० | उत्कृष्ट पुस्तक परीक्षण व निबंध लेखन (प्रथम क्रमांक) | १९-२६ |
| ११ | उत्कृष्ट पुस्तक परीक्षण व निबंध लेखन (द्वितीय क्रमांक) | २७-३० |
| १२ | उत्कृष्ट पुस्तक परीक्षण व निबंध लेखन (तृतीय क्रमांक) | ३१-३४ |

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

## प्रास्ताविक

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित, महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुड, स्थानिक येथिल ग्रंथालय व ज्ञान संसाधन केंद्र यांच्या वतीने "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" ह्या उपक्रमांतर्गत येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य शासन व विद्यार्थी कल्याण विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या निर्देशानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. दिनांक १ जानेवारी २०१५ ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाचन पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयांत दिनांक ३० डिसेम्बर ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत विविध ग्रंथाची प्रदर्शनी लावण्यात आली होती , या प्रदर्शनीचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. दिलीप व्ही.हांडे यांचे हस्ते करण्यात आले. तसेच तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. सुनील काळमेघ, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. उमेंद्र सांगोळकर यांच्या हस्ते शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेला हारार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनीमध्ये उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला,


दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी वाचन कौश्यल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन कार्यक्रम नुकताच संपन्न झाला कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख करण्यात व ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेला हारार्पण करून झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा डॉ. सुनील कालमेघ, विभाग प्रमुख तत्वज्ञान विभाग तर व्याख्याते

म्हणून डॉ उपेंद्र सांगोळकर महात्मा फुले महाविद्यालय वरुड व प्रा लक्ष्मण पवार वरिष्ठ प्राध्यापक, मराठी विभाग उपस्थिती होते. सुरवातीला सर्व उपस्थितांना सामुहिक वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला, सर्व प्रथम प्रा. एल एस पवार यांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या सुरवातीला वाचनाचा संकल्प करण्याबाबत दररोज जास्तीत जास्त वाचन करावे असा संकल्प करावा, त्यामुळे आपल्याला लेखन व सादरीकरण करण्यास चालना मिळते असा संदेश देण्यात आला. प्रा. डॉ. उपेंद्र सांगोळकर यांनी वाचनाने जीवन समृद्ध होत असते, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या "वाचाल तर वाचाल" या वाक्याचे स्पष्टीकारण विशद केले व त्यामुळे आपण वाचनाचा वसा घ्यावा त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचन कसे करावे , ग्रंथ वाचनामुळे जीवनामध्ये होणारी प्रगती, दररोज वाचन किती तास करावे , वाचनाचे महत्व ,विशद केले असे विचार मांडले. मा डॉ सुनील कालमेघ यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना वाचन कौश्यल्य विकासातील करण्याकरिता पुस्तकाची पाने समजावून घ्यावी पुस्तक कोणतेही असो ती वाचल्याने तुमच्या ज्ञानात अवश्य भर पडेलच अशी ग्वाही दिली. ग्रंथ वाचनाचे महत्व, वाचनाने माणूस कसा घडतो ,या बाबतचे महत्व विशद केले. शिक्षणासोबत्त वाचन हे अत्यंत महत्वाचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन, प्रास्ताविक सूत्र संचालन ग्रंथपाल सुधाकर घोरपडे यांनी केले तर आभार प्रदर्शन संदीप मांडवे यांनी मांडले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

तसेच या वाचन पंधरवड्याचा एक उपक्रम म्हणून दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी लेखक - वाचक परीसंवाद कार्यक्रमाचे आयोजन संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ. चंदू पाखरे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनांतून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व लेखक, मार्गदर्शक डॉ. करुणा आंडे, मराठी विभाग, मा. डॉ. शुभांगी सोनार राज्यशास्त्र विभाग, व मा प्रा . एल .एल पवार तसेच राष्ट्रीय सेवा योजना-

समन्वयक प्रा. विलास हिरनवाडे समिती सदस्य उपस्थित होते. यामध्ये पुस्तक परीक्षण कसे करावे. प्रत्येकाचे वाचन असेल तरच वाचनात सक्षमता येऊ शकते, विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौश्यल्य विकासाच्या दृष्टीकोनातून आणि वाचन कौश्यल्य विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल, असे प्रतिपादन डॉ करुणा आंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लेखक वाचक संवाद कार्यक्रमा मध्ये डॉ. शुभांगी सोनार यांनी सामाजिक भावनिक ,आणि मानसिक दृष्ट्या व्यक्तीला परिपक्व होण्यास वाचनाची फार मदत होते , असे विषद केले तसेच, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, यामध्ये एक पुस्तक वाचून त्यावर किमान ५०० शब्दांचे निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले होते. या स्पर्धेमध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्या उत्कृष्ट निबंध लेखनामध्ये कु. वैष्णवी रगडे प्रथम क्रमांक व द्वितीय क्रमांक कु. नंदिनी सुरेंद्र इज़नकर व तृतीय क्रमांक कु. जय सुधाकर गावंडे या विद्यार्थ्यांनी पटकाविला. तसेच सागर निंबाळकर व कु ऋतुजा राजीव सोनवणे यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व बाकी सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.

# ग्रंथप्रदर्शनीचे उदघाटन व सहभागी विद्यार्थी






## ग्रंथप्रदर्शनीमध्ये मध्ये सहभागी शिक्षक व विद्यार्थी






## ग्रंथप्रदर्शनीमध्ये मध्ये सहभागी विद्यार्थी





## दैनिक मातृभूमी वृत्तपत्र जाहिरात दिनांक २ जानेवारी २०२५

# मातृभूमि
अमरावती

# महात्मा फुले महाविद्यालयात वाचन संकल्प



### महाराष्ट्राच्या वाचन पंढरवाड्याचे आयोजन

**ता.प्रतिनिधी। १ जानेवारी**

**वरुड** – महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय वरुड येथे ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ३० डिसेंबर २०१४ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन पंढरवाड्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पुस्तके सर्जनशीलता आणि चातुर्य शिकविते, पुस्तके विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि भावनिक वाढीची गुरुकिल्लेआहे, म्हणुनच वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयात केले आहे. तरुण पिढीला भारताची संस्कृती, गौरवशाली परंपरा इतिहास. सामाजिक न्यायाचे विचार, धार्मिक आणि सामाजिक चौकट, राष्ट्र बांधणी आणि राष्ट्र उभारणीचे धडे संविधानिक मुल्ये, पुस्तकांमधुनच मिळतात या करीता पुस्तक वाचणे गरजेचे बनले आहे. सर्व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी हा उद्देश समोर ठेवुन ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या वाचन पंधरवाड्यात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमात ३० डिसेंबर २०२४ ते ५ जानेवारी २०२४ पर्यंत ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे, त्याच प्रमाणे नवीन वर्षाच्या सुरुवातीला वाचन कौशल्य कार्यशाळा व सामुहिक वाचन तसेच लेखक व विद्यार्थी वाचन संवाद आणि पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, यामध्ये एक पुस्तक वाचुन त्यावर किमान ५०० शब्दांचे निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. उत्कृष्ट निबंध लेखांना बक्षीस देण्यात येईल व बाकी सर्व सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देण्यात येईल असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## दैनिक मातृभूमी वृत्तपत्र दिनांक १० जानेवारी २०२५

*'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' वाचन पंधरवडा निमित्त*

# महात्मा फुले महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनी



**ता.प्रतिनिधी। ९ जानेवारी**

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने दिनांक ३० डिसेंबर ते ६ जानेवारी या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' वाचन पंधरवडा निमित्त ग्रंथप्रदर्शनिचे आयोजन महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात नुकतेच संपन्न झाले.

या प्रदर्शनीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप व्ही.हांडे यांचे हस्ते करण्यात आले तसेच तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.सुनील काळमेघ, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.उमेंद्र सांगोळकर यांच्या हस्ते शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेला हारार्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल सुधाकर घोरपडे, सहा.प्रा.साखरे, वनस्पतीशास्त्र ग्रंथपाल संदीप मांडवे व इतर सर्व प्राध्यापक उपस्थित होते. या ग्रंथ प्रदर्शिनीमध्ये दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ तसेच नवीन आलेले डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे आत्मचरित्र्यावर नवीन ग्रंथ, स्पर्धा परिक्षा संबंधीचे ग्रंथ, विविध थोर समाज सुधारकांचे आत्मचरित्र्यावर व इतर ग्रंथ वाचकाकरीता ठेवण्यात आले होते. ग्रंथप्रदर्शनीच्या आयोजनाकरीता महाविद्यालयाचे ग्रंथपाल सुधाकर घोरपडे, सहाय्यक ग्रंथपाल संदीप मांडवे, त्र्यंबक सुरजुसे, भाऊराव खंडारे आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह अनेकांनी ग्रंथप्रदर्शनीचा लाभ घेतला.

## वाचन कौश्यल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन




वाचन कौश्यल्य  कार्यक्रमात  सहभागी विद्यार्थी



## वाचन कौश्यल्य  कार्यक्रमात  मार्गदर्शन करतांना मार्गदर्शक








## दैनिक मातृभूमी वृत्तपत्र जाहिरात दिनांक ८ जानेवारी २०२५



अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, पाच स्वतंत्र आवृत्या

सुविचार
सगळ्याच गोष्टीमध्ये तुम्ही तरबेज नसाल मात्र अश्या बऱ्याच गोष्टी आहेत ज्यात तुम्ही तरबेज असाल त्या शोधा.

90 वर्ष जुनं ते सोनं

मो.9284243442
मो.9422918686

RNI : MAHMAR/2010/35500
Postal. No. ATI/RNP/291/17-19

संपादक- अनिल अग्रवाल

# मातृभूमि

अमरावती

संस्थापक : स्व. ब्रजलालजी बियाणी

● बुधवार, दि. ८ जानेवारी २०२५ ● किंमत –४.०० रु. ● पाने १२

FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI

KARALE'S SIR ORBIT • For Class •
SUBJECT:-CHEMISTRY
For XI Class Student:- If You Are Not Satisfied In Current Place Then Come And Go With Success
C/O. BEHIND HOLE HOSPITAL,RENUKA NAGAR, PANDHURNA CHOWK,WARUD-444906 Cell:7709875161

# वाचन कौश्यल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन

● महात्मा फुले महाविद्यालयात आयोजन

**ता.प्रतिनिधी। ७ जानेवारी**

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार नवीन वर्षाच्या सुरवातीला वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाअंतर्गत १ जानेवारी ते १५ जानेवारी पर्यंत वाचन पंढरवाड्याचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने १ जानेवारीला वाचन कौश्यल्य कार्यशाळा व सामूहिक वाचन कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.



कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेला हारार्पण करुन झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.डी.व्ही.हांडे होते तर प्रमुख अतिथी तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.सुनील कालमेघ, तर व्याख्याते म्हणुन डॉ.उपेंद्र सांगोळकर, मराठी विभागप्रमुख, वरिष्ठ प्राध्यापक प्रा.लक्ष्मण पवार उपस्थिती होते. सुरवातीला सर्व उपस्थितांना सामुहिक वाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या सुरवातीला वाचनाचा संकल्प करण्याबाबत दररोज जास्तीत जास्त वाचन करावे, असा संकल्प करावा, त्यामुळे आपल्याला लेखन व सादरीकरण करण्यास चालना मिळते, असा संदेश प्रा.एल.एस.पवार यांनी दिला. वाचनाने जीवन समृद्ध होत असते, डॉ.बाबासाहेब आंबेडर यांनी लिहिलेल्या 'वाचाल तर वाचाल' या वाक्याचे स्पष्टीकरण विशद केले व त्यामुळे आपण वाचनाचा वसा घ्यावा, त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचन कसे करावे, ग्रंथ वाचनामुळे जीवनामध्ये होणारी प्रगती, दररोज वाचन किती तास करावे, वाचनाचे महत्व प्रा.डॉ.उपेंद्र सांगोळकर यांनी विशद केले. डॉ.सुनील कालमेघ यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना वाचन कौश्यल्य विकासातील करण्याकरीता पुस्तकाची पाने समजावुन घ्यावी, पुस्तक कोणतेही असो ती वाचल्याने तुमच्या ज्ञानात अवश्य भर पडेलच, अशी ग्वाही दिली. ग्रंथ वाचनाचे महत्व, वाचनाने माणुस कसा घडतो, या बाबतचे महत्व विशद केले. शिक्षणासोबत वाचन हे अत्यंत महत्वाचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजन, प्रास्ताविक व संचालन ग्रंथपाल सुधाकर घोरपडे तर आभार संदीप मांडवे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.

## लेखक - वाचक परीसंवाद व सहभागी विद्यार्थी






## पुस्तक परीक्षण व निबंध लेखन स्पर्धा

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

**महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय ,वरुड जि. अमरावती**

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"

**ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने**

**पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा**

सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, महाविद्यालयीन ग्रंथालय विभागाच्या वतीने दिनांक कि १६ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथालयात पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धे चे आयोजन केलेले आहे, तरी स्पर्धेत सहभागी होण्याकरिता ग्रंथालयात संपर्क करावा.

**स्पर्धेचे नियम :-**

१) या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडीच्या क्षेत्रातील पुस्तक निवडून संपूर्ण पुस्तकाचे सखोल वाचन करावे आणि आपल्या आकलनामध्ये वाचलेल्या पुस्तकावर चिंतनात्मक व समीक्षात्मक परीक्षण करून निबंध लिहून तो संयोजकाकडे सुपूर्त करावा .

३)प्रस्तुत परीक्षण निबंध किमान ५०० शब्दांचा असावा.

४)वाचनासाठीचे पुस्तक कुठल्याही भाषेचे आणि कुठल्याही विषयाचे (साहित्यापासून ते तंत्रज्ञानापर्यंत ) कोणतेही पुस्तक निवडू शकता .

५)निवडलेले पुस्तक हे प्रवेशित विद्यार्थ्यांचे क्रमिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त असावे .

६) स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व उत्कृष्ट्र तीन स्पर्धकांना बक्षीस देण्यात येईल.

| ग्रंथपाल | एन.एस.एस .समन्वयक | प्राचार्य |
|---|---|---|
| प्रा. एस. टी. घोरपडे | प्रा. व्ही. आर. हिरणवाडे | डॉ. डी. व्ही. हांडे |







“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”



## दैनिक मातृभूमी वृत्तपत्र जाहिरात दिनांक 20 जानेवारी २०२५

अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, पाच स्वतंत्र आवृत्या

सुविचार
यशाकडे जाणारे रस्ते कधीच सरळ नसतात मात्र यश मिळाल्यावर सर्व रस्ते सरळ होतात.

संपादक- अनिल अग्रवाल

# मातृभूमि

संस्थापक : स्व. ब्रजलालजी बियाणी

अमरावती

पालकमंत्री पदाच वाटप होताय महायुतीत वाद?

90 वर्ष जुनं ते सोनं

मो.9284243442
मो.9422918686

RNI : MAHMAR/2010/35500
Postal. No. ATI/RNP/291/17-19

● सोमवार, दि. २० जानेवारी २०२५ ● किंमत –४.०० रु. ● पाने १२

FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI




# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत विविध कार्यक्रम

## ● महात्मा फुले महाविद्यालयात आयोजन




**ता.प्रतिनिधी। २० जानेवारी**

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. १ ते १५ जानेवारी पर्यंत वाचन पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी पर्यंत विविध ग्रंथाची प्रदर्शनी लावण्यात आली होती. सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनीमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या वाचन पंधरवड्याचा एक उपक्रम म्हणुन लेखक वाचक परीसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यातत आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन मराठी विभाग प्रमुख डॉ.चंदू पाखरे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनांतून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व लेखक, मार्गदर्शक डॉ.करुणा आंडे, डॉ.शुभांगी सोनार व प्रा.एल.एल.पवार तसेच राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.विलास हिरनवाडे उपस्थित होते. यामध्ये पुस्तक परीक्षण कसे करावे? प्रत्येकाचे वाचन असेल तरच वाचनात सक्षमता येऊ शकते, विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौश्यल्य विकासाच्या दृष्टीकोनातून आणि वाचन कौश्यल्य विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल, असे वक्तव्य यावेळी अतिथींनी केले.

यावेळी कथा कथन स्पर्धा व निबंध स्पर्धेचे सुध्दा आयोजन करण्यात आले आहे. निबंध स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय तृतीय, पारितोषिक ठेवण्यात आली आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी कथाकथन स्पर्धेत उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे निबंध स्पर्धेध्ये प्रथम, द्वितीय तृतीय, पारितोषिक ठेवण्यात आली आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल एस.टी.घोरपडे, संचालन समिती सदस्य प्रा एल.एस.पवार तर आभार संदीप मांडवे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता ग्रंथालयातील त्र्यंबक सुरजुसे, ग्रंथालय परिचर भाऊराव खंडारे यांनी परिश्रम केले, याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

दैनिक वृत्तपत्र वरुड दर्पण जाहिरात दिनांक 20 जानेवारी २०२५

वरुड दर्पण





## महात्मा फुले महाविद्यालयात

# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत विविध कार्यक्रम

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

**वरुड** - शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१ ते १५ जानेवारी पर्यंत वाचन पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी पर्यंत विविध ग्रंथाची प्रदर्शनी लावण्यात आली होती. सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनीमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या वाचन पंधरवड्याचा एक उपक्रम म्हणुन लेखक वाचक परीसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यातत आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन मराठी विभाग प्रमुख डॉ.चंदू पाखरे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व लेखक, मार्गदर्शक डॉ.करुणा आंडे, डॉ.शुभांगी सोनार व प्रा.एल.एल.पवार तसेच राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.विलास हिरनवाडे उपस्थित होते. यामध्ये पुस्तक परीक्षण कसे करावे ? प्रत्येकाचे वाचन असेल तरच वाचनात सक्षमता येऊ शकते, विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौश्यल्य विकासाच्या दृष्टीकोनातून आणि वाचन कौश्यल्य विकसित करण्याकरिता विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल, असे वक्तव्य यावेळी अतिथींनी केले. यावेळी कथा कथन स्पर्धा व निबंध स्पर्धेचे सुध्दा आयोजन करण्यात आले आहे. निबंध स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय तृतीय, पारितोषिक ठेवण्यात आली आहेत. सर्व विद्यार्थ्यांनी कथाकथन स्पर्धेत उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे निबंध स्पर्धेध्ये प्रथम, द्वितीय तृतीय, पारितोषिक ठेवण्यात आली आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल एस.टी.घोरपडे, संचालन समिती सदस्य प्रा एल.एस.पवार तर आभार संदीप मांडवे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता ग्रंथालयातील त्र्यंबक सुरजुसे, ग्रंथालय परिचर भाऊराव खंडारे यांनी परिश्रम केले, याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

20 Jan 2025 - Page 6 | epaper.waruddarpan.com
Powered by softisky | 9764331134

## उत्कृष्ट पुस्तक परीक्षण व निबंध लेखन प्रथम क्रमांक

कु. वैष्णवी के.रगडे   वर्ग  ( बी.कॉम. भाग. ३)

राष्ट्रसंत तुकडोजी प्रणित

### महिलोन्नती

लेखिका डॉ. स्वाती चोरे यांचे 'राष्ट्रसंत तुकडोजी प्रणित महिलोन्नती' हे पुस्तक म्हणजे त्यांच्या 'राष्ट्रसंत तुकडोजींच्या मराठी गद्य-पद्य रचनांमधून "महिलोन्नती" विचाराच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास' या शोधप्रबंधाचे हे ग्रंथरुप होय. या शोधप्रबंधाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने जानेवारी २०१७ ला 'आचार्य' ही पदवी बहाल करुन सन्मानित केले, त्याबद्दल या शोधप्रबंधाच्या मार्गदर्शक म्हणून मला सार्थ अभिमान वाटतो. या शोधप्रबंधाच्या मार्गदर्शक म्हणून मलाही या प्रचंड अभ्यासातून घुसळून निघावे लागले, त्याचाही ज्ञानात्मक पातळीवर मला मोठा लाभाचे झाला आहे.

भारतीय स्वराज्यप्राप्तीपूर्वी मध्यप्रांत-वऱ्हाड म्हणून ओळखले जाणाऱ्या प्रदेशात पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्ह्यात यावली गावी जन्मलेले एक तेजस्वी माणिक म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (१९०९ ते १९६८). केवळ ५९ वर्षाच्या आयुष्यक्रमात आपल्या प्रेरणादायी बहु-आयामी व्यक्तित्वाच्या आणि असाधारण कर्तृत्वाच्या बळावर भारतभर संचार करुन जननायकत्व प्राप्त केलेले आधुनिक काळातले ते एकमेव संतकवी होत. त्यांच्या व्यक्तित्वात एक निस्सीम भक्त, एक कठोर हठयोगी, एक आधुनिक जनसारस्वत, एक निष्णात गायन-वादन कलावंत, एक समाजसेवी जनसंघटक, एक मूलग्राही धर्मसुधारक - इतकेच नव्हे तर एक विशालहृदयी तत्वज्ञाही क्रियाशील असल्याचे जाणत्यांच्या।

अनुभवास वेळोवेळी आले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळातही आपल्या भजन - भाषणांद्वारे समाजप्रबोधनाचे व ग्रामनिर्माणाचे मौलिक कार्य केले. एक आधुनिक संत व विचारक म्हणून त्यांचे कार्य अलौकिकच म्हणावे लागले. या ग्रंथाच्या अभ्यासातून - शोधकार्यातून राष्ट्रसंतांच्या मनात 'मानवोन्नती' च्या संदर्भातील चिंतनाचा विकास कसा घडत गेला हे त्यांच्या मराठी गद्य- पद्य वाङ्‌मयातून अधोरेखित केले आहे. त्यासाठी त्यांच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंतची माहिती देण्यात आली असून त्याद्वारे त्यांच्या विचारावरही प्रकाश टाकलेला आहे. 'वसुधैव कुटुंबकम् ', 'हे विश्वचि माझे घरे ' मानण्याकरिता बालक जन्माला आले होते, असेच जणू निसर्गाने सुचविले. आपला जन्म, वातावरण व परिस्थिती या संबंधी महाराज स्वतःच ग्रामगीतेतील सदतिसाव्या अध्यायात म्हणतात -

"लहान ऐशा गावामाजी। मागासलेल्या जनसमाजी।
उपासाचीच लाभे रोजी। ऐशा ठायी जन्मला ॥१९॥"

"घरी दारिद्र्याचे वरदान। परि भावभक्तीची नसे वाण।
ऐकले सुसंस्काराचे गान। सोशीत कष्ट, वाढलो ॥२०॥"

महाराजांनी दर्शविलेले ते लहानसे गाव म्हणजेच अमरावती जिल्ह्यातील यावली हे होय.

( मेरी जीवनयात्रा )

'खेला नहीं मै खेल बचपन से बिना प्रभू-नाम के।
चंचल हुआ नहिं मन मेरा कुछ भोग भोग हराम के॥
मुझसे हुआ नहिं नहिं दर्द किसको, और ने चाहे दिया
हसता हि था मै संकटो में, शक्ति यह गुरु की दया॥'

## राष्ट्रसंताचे "स्त्रीयांच्या शिक्षणविषयक चिंतन

'जीवन - शिक्षण' या एकोणिसाव्या अध्यायात राष्ट्रसंतांनी स्त्रियांच्या जीवनशिक्षणाचाही गांभीर्याने विचार मांडलेला दिसतो. मेकॉलेप्रणीत शिक्षण नीरस, विवेकशून्य व माणसाला जीवनापासून परागंदा करणारे होते. त्यातूनच म. गांधींनी आपले जीवनशिक्षणविषयक विचार मांडलेले आहेत. 'ज्या शिक्षणाचा जीवनाशी संबंध नाही असे शिक्षण काय कामाचे ?' म्हणून म. गांधींनी मानवी जीवन सुखी, संपन्न व समृद्ध बनविणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादिली. त्यातूनच त्यांची ग्रामोद्योगाची योजना उदयास आली.

तुकडोजी महाराजांनी म. गांधीच्या विचाराचा धागा धरुन, भारत स्वतंत्र झाल्यावर स्त्री - शिक्षणविषयक विचारांचा विशेष विचार करुन त्यांनी जीवनशिक्षणाचा अवलंब कसा करावा, जीवन सुखी व समृद्धी करण्यासाठी कोणकोणती कौशल्ये प्राप्त करुन घ्यावीत या विषयीचे चिंतन विस्ताराने मांडले आहे. राष्ट्रसंत म्हणतात - "दिखाऊ कपडे, कोरडी ऐट । नोकरपेशी थाटमाट । हे शिक्षणाचे नव्हे उद्दिष्ट ।' तर 'आता व्हावा कुशिक, बलवान । सुपुत्र भारताचा।"

— "शिक्षणातचि जीवनाचे काम । दोन्हींची सांगड व्हावी उत्तम ।
चिंतन नसावी भोजनासाठी दाम । मागण्याची भीक जैसी ॥"

राष्ट्रसंतांनी शिक्षणाला जीवनाशी एकात्मिकपणे जोडलेले आहे. म्हणून केवळ पुस्तकी ज्ञानाच्या भरीस न पडता ('मुलात एखादा तरी असावा गुण । ज्याने पोट भरेल निपुण।') असा आग्रह ते धरतात. प्रपंचातील आवश्यक बाबींचेही ज्ञान शिक्षणाद्वारे त्याने अवगत केले पाहिजे. शिक्षण कसे असावे हे सांगतात राष्ट्रसंत म्हणतात -

"जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहिचे एकेक साधन ।
संबंधित विषयांचे समग्र ज्ञान । यांचा अंतर्भाव शिक्षणी ।"

राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराजांनी जी साहित्य निर्मिती केली त्याद्वारे त्यांनी जे कालोचित व नाविन्यपूर्ण चिंतन मांडले ते आश्चर्यकारक असून, त्यांच्या मार्ग हा समन्वयाचा असला तरी त्यांनी सत्य निर्भीडपणे मांडलेले दिसून येते. राष्ट्रसंतानी वयाच्या सोळाव्या-सतराव्या वर्षीच जी ओवीबद्द ग्रंथरचना केली, त्यांतून त्यांच्या पुढील साहित्यनिर्मितीची कल्पना येते. रामटेक, ताडोबा, रामदिघी, गोंदुडा इ. जंगलातील योगसाधनेनंतर एक्के, सप्ते, चातुर्मास, संतदर्शन व तीर्थयात्रांपासून सुरु झालेले त्यांचे सामुदायिक स्वरुपाचे उपक्रम क्रमाक्रमाने विकसित होत व्यापक सामाजिक व सांस्कृतिक अभ्युदयाच्या दिशेने कार्यान्वित होते गेलेले दिसून येतात. मंजुळामातेच्या जीवनसंघर्ष व चरित्र हे एकंदरीत स्त्री जीवनासाठी एक आदर्श असून, राष्ट्रसंतांचे वडील बंडोजीचे चरित्र हे तर पुरुषसत्ताक संस्कृतीचे प्रतीकच होते. या जीवनसंघर्षातून व अनुभवातून राष्ट्रसंतांच्या मनात स्त्री जीवनाविषयी प्रचंड आस्था, प्रेम व सहानुभूती निर्माण झाली असावी; व त्यातूनच त्यांच्या स्त्री विषयक चिंतनाचा व कार्याचा उगम झाला असावा असे दिसून येते.

'महिलांच्या संस्था अलग असव्यात आणि त्यात कार्य करणाऱ्याही महिलाच असाव्यात' या महाराजांच्या महिलामंडळातील धोरणामुळे, पुढे पुढे महिलामंडळाचा विकास खुंटण्यामागे इतर कारणांप्रमाणेच पुरुषांना सत्कार्यप्रवण करणे, पतीची सेवा करणे, स्वत: निर्भय व चरित्रवान बनने आणि आपल्या संततीस समाज कार्यासाठी व राष्ट्रकार्यासाठी योग्य वळण लावणे-हाच राष्ट्रसंतांच्या मते 'खरी स्त्रीधर्म' होय.

उलट ज्या माणसाचे चरित्र उज्ज्वल व पवित्र आहे, ज्याची राहणी स्वच्छ व पवित्र आहे, ज्याचे घरी अतिथींचे उत्तम आदरातिथ्य होते तेथे तर साक्षात पंढरपुराचाच अनुभव येतो.

-"पाय टाकताचि घरी। दिसे रांगोळी गोपुरी ॥
आत जरा जाता आड। तुळसीचे दिसे झाड ॥
दारी सडा स्वच्छ पडे। मन संतोषी पवाडे ॥
तुकड्या म्हणे सर्व घर। जैसे दिसे पंढरपुर ॥"

राष्ट्रसंतांनी ८१७ व्या 'सुविचार स्मरणी' मध्ये ५४ ओळींचे एक सताल गद्य काव्यात ते म्हणतात -

"माता असावी पण पुत्रास वीर बनवून सोडणारी
स्त्री असावी पण मालकाकरिता जीव देणारी
पती असावा पण स्त्रीला मिळून वागवणारा"

ज्या स्त्री-पुरुषांना आई, बहीण, भाऊ, मुलगी, बाप या मानवीय संबंधातील भावनात्मक व सामाजिक पावित्र्य जपता येत नसेल, ते लोक जनावरांपेक्षाही खालच्या पातळीवरचे असून, अशांचे तोंडही पाहू नये. ज्या कुटुंबामध्ये स्त्री-पुरुष परस्परांना समजून घेऊन त्यांच्या नैसर्गिक, स्वतंत्र अस्तित्वाचे व त्यामागील समानतेच्या सूत्राचे भान त्या कुटुंबातील लक्ष्मी (पत्नी) ही सदैव आनंदी राहून त्या घराचे चैतन्य नांदू लागते. आपल्या कुटुंबाचे असे सुंदर व्यवस्थापन करणाऱ्या पुरुषास राष्ट्रसंतांनी 'तोचि खरा गृहावासी' असे संबोधले आहे.

"कधी मारीना स्त्रियेसी। तोचि खरा गृहवासी ॥
भोगी आपत्तिचा भार। तरी त्यागी नये नार ॥"
" ज्याचे घरी लक्ष्मी खूश; तेथे द्रव्याचा संतोष ॥
ज्याची लक्ष्मी रागावली। त्याची बुळघाणी झाली ॥"

राष्ट्रसंतांच्या मते मुलांना जन्म देण्याऱ्या आईपेक्षाही त्यांच्यावर उत्तम संस्कार करून त्याला राष्ट्रकार्यासाठी अर्पण करणे व समाजात 'बंधुभगिनीभाव' निर्माण व्हावा यांवर भर दिला आहे. 'श्रीगुरुदेव विवाह पध्दती' ही वेळ, पैसा व श्रम वाचविणारी विवाह पध्दती आहे.

"जीवनाचे प्रत्येक अंग । शिकवावा महत्त्वपूर्ण उद्योग ।
काम करावयाची चांग । लाज नसावी विद्यार्थ्यां ॥"

- असे विद्यार्थी घडविणे, गरीब विद्यार्थ्यांनाही शिक्षणाच्या लाभ मिळवून देणे व विद्याव्रती - आदर्श शिक्षक तयार करणे हे या अध्याय निर्मितीचे प्रयोजन दिसून येते.

"स्त्री- पुरुष ही दोन चाके । जरि परस्पर सहायके ।
तरीच संसार - रथ चाले कौतुके । ग्राम होई आदर्श ॥"

या अध्यायात राष्ट्रसंतांनी हुंडापध्दती, बालविवाह इत्यादि विवाहसंबद्ध चालीरीतिंचे मानवीय व विज्ञाननिष्ठ भूमिकेतून चिंतन व विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार देणे, वधुवरांना विवाह निर्णयाचे स्वातंत्र्य देणे तसेच मिश्रविवाह, आंतरजातीय विवाह व संमतिविवाहांना प्रोत्साहन देण्यावर ते भर देतात.

ग्रंथाध्ययन -

जे 'सहज कळेल तेचि उत्तम समजावे' हे उत्तम ग्रंथाचे लक्षण सांगतानाच कोणत्या ग्रंथातून काय घ्यावे, काय आचरावे त्याचे तारतम्यही महत्त्वाचे आहे, यावर राष्ट्रसंत भर देतात. ज्या ग्रंथ वाचनामुळे ग्रामशुद्धी होईल, लोकांना प्रेम, ज्ञान सत्य, आनंद इत्यादींची प्रीति लाभेल. 'सर्वांस लाभेल ऐसे सुबुद्ध ग्रंथ गावी लावावे.'

- "होईल जीवनाची उन्नति । ज्ञान- विज्ञानाची प्रगति ।
ऐसीच असावी ग्रंथ संपत्ति । गावोगावी ॥"

'ईश्वरे व्यापिले हे विश्व । म्हणोनि जगचि आम्ही देवा' असा हा देव म्हणजे 'ग्रामनाथ'.

स्त्रीवादी विचारधारा -

'ग्रामगीते'च्या 'महिलोन्नती' (अ. २०) या अध्यायात तसेच 'धर्माध्ययन', 'वैवाहिक जीवन', 'जीवन-शिक्षण' राष्ट्रसंतांच्या महिलोन्नती विचारातून स्त्रियांच्या स्थितीगतीचा विचार करण्यासाठी भारतीय व पाश्चिमात्य परिप्रेक्ष्यात स्त्रीमुक्ती / स्त्री-पुरुष समानता या संदर्भात काय परिस्थिती आहे, हे शोधण्यात घेऊन येणे महत्त्वाचे ठरले.

शेतीचे तंत्र प्रथम स्त्रीने शोधले असल्यामुळे शेतीच्या शोधाचे श्रेय "स्त्री"ला द्यावे लागते. परंतु पुढे पुढे जसजशी उत्पादकता वाढत गेली तसतशी पुरुषसत्ताक मानसिकतेने स्त्रियांना दुय्यम ठरवित त्यांना गुलाम करण्यात आले. देशातील अर्धी लोकसंख्या ही पुरुषांची आहे, तर अर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. स्त्रियांचा आत्मसन्मान व स्वातंत्र्य हा नेहमीच राष्ट्रसंतांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय राहिलेला आहे. अमरावतीच्या 'राष्ट्रसेविका समिती'च्या संमेलनात (दि. ४-९-१९४४) राष्ट्रसंत म्हणतात, 'जेव्हा जेव्हा आपण एकूण समाज प्रगत झाल्याचे इतिहासात पाहतो, तेव्हा तेव्हा महिलांचीही पुरुषांइतकीही तयारी होती असे आढळून येते. पुरुषांनी मात्र स्त्रियांच्या बाबतीत आपले कर्तव्य पार पाडले नाही. त्यांना योग्य ज्ञान व वाव दिला नाही आणि जोपर्यंत ते या गोष्टीकडे दुर्लक्ष करतील तोपर्यंत स्त्रीरुपाने दिसून येणारा अर्धा समाज-अर्धे राष्ट्र केव्हाही प्रगत होणार नाही.'

"स्त्रिया-मुले होतील आदर्शपूर्ण। हा ग्रंथ घरी होता पठण
ग्राम होईल वैकुंठभुवन। वाचता-वर्तता ग्रामगीता।।"

आजची भारतीय स्त्रीवादी चळवळ ही पाश्चात्य स्त्रीवादामुळे प्रभावित झालेली असली तरी तिचा उगम प्रत्यक्षात पेक एकोणिसाव्या शतकात सुरु झालेल्या सुधारकांच्या चळवळीतून झालेली दिसून येते. स्त्रीमुक्ती चळवळीचा एकांगी / अतिरेकी विचार तुकडोजी महाराजांच्या व स्त्रीविषयक परंपरागत भारतीय संस्कार यांचा सुरेख समन्वय स्त्री-जीवनाच्या संदर्भात साधावयाचा आहे. आदर्श जीवनसंस्कार हे मुलामुलींसाठी सारखेच असून ते टिकून राहावेत यासाठी "शिकवावे बंधुभगिनी प्रेम" हा उपायही राष्ट्रसंत सुचवितात. यातून ग्रामसुधाराचे, राष्ट्रोन्नती आणि महिला सबलीकरणाचे मार्ग मोकळे होतील, असा राष्ट्रसंतांचा विश्वास आहे. राष्ट्रसंतांवर मनात भारतीय स्त्रीची एक आदर्श प्रतिमा असून, त्यांच्या मते मातृपद हे जगातील सर्वश्रेष्ठ असे पद असून ते "शकडो गुरुहुनिही" थोर आहे. महिलांच्या सबलीकरणाची प्रक्रिया योग्य दिशेने व्हायची असेल तर ज्ञान व शक्तीबरोबर "उन्नतिभवन" (महिला मंडळ) या सारख्या संघटनेची आवश्यकता व्यक्त केली असून, राष्ट्रसंतांनी सुचविलेला हा राजमार्ग जातिविहीन महिला संघटनाचा आहे.


- मध्ययुगीन संतांचे नावे. चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एक नाथ, संत रामदास, संत तुकाराम.
- आधुनिक काळातील समाजसुधारकांचे नाव. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, गोपाळ हरी देशमुख, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रा. गो. भांडारकरांनी, न्यायमूर्ती महादेवी गोविंद रानडे, डॉ. भाडारकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा गांधी

या ग्रंथात मांडलेला, याबद्दल लेखिका डॉ. स्वाती चोरे यांचे मी हार्दिक अभिनंदन करते.

नाव कु. वैष्णवी किशनाजी रगडे (B.Com III)

# उत्कृष्ट पुस्तक परीक्षण व निबंध लेखन द्‌वितीय  क्रमांक

**कु. नंदिनी सुरेंद्र इजनकर  वर्ग १२ वी (वाणिज्य)**



द्वितीय क्रमांक - २

PAGE NO.
DATE

भाऊसाहेबांच्या विचारधारा

'पाने आठवणींची' डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या स्मृतीला उजाळा देणारा लेखसंग्रह डॉ. चंदन मोहोड आणि डॉ. सौ. वीणा मोहोड या उभयतांनी भाऊसाहेबांच्या जन्मशताब्दी निमित्ताने प्रकाशित केला. आता दुसऱ्या आवृत्तीसाठी प्रस्तावना मी लिहावी म्हणून मोहोड दाम्पत्यांचा आग्रह; परंतु भाऊसाहेबां सारख्या दैदीप्यमान व्यक्तिमत्त्वाच्या पुस्तकाला प्रस्तावना हवी कशाला? असे असले तरी या निमित्ताने मलाही भाऊसाहेबांविषयीची आत्मीयता, श्रद्धा, आदर व्यक्त करण्याची संधी मिळाली.

भाऊसाहेब म्हणजे विदर्भाला पडलेले एक सुंदर स्वप्नच होते जणू. गीताजयंतीचा जन्म आणि रामनवमीला मृत्यू या दोन्ही घटना असामान्यत्वाचाच नव्हे तर संत महात्म्याचा परिचय घडवून देतात. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख पाहिला तर आश्चर्य न वाटले तर नवलच. भाऊसाहेब हयात नाहीत;

PAGE NO.
DATE / /

परंतु श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ते अमर आहेत. आज त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेचा वटवृक्ष अनेक फांद्यांनी विस्तृत झाला आहे. लाखो विद्यार्थी विविध शाखांमधून ज्ञानामृत पिऊन गगनात उड्डाण करायला समर्थ होत आहेत.

भाऊसाहेबांनी शिक्षणाचे महत्त्व शेतकऱ्यांच्या, बहुजनांच्या मुलांपर्यंत पोहचवून त्यांसाठी तशा सोयी निर्माण करून दिल्यात. 'श्रद्धानंद वसतिगृह' हे त्याचेच द्योतक आहे. गोरगरिबांना शिक्षण घेता यावे म्हणून अमरावती जिल्ह्यात प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये स्थापन केलीत आणि ज्ञानाचा दिवा घरांघरांमध्ये पोहचविण्याचे कार्य केले. इतकेच नव्हे तर एक एक माणूस पारखून संस्थेमध्ये दाखल करून घेऊन संस्थेचा विस्तार आणि विकास केला.

शिक्षणाबरोबर विदर्भातील शेतकऱ्यांची अवस्था पाहून त्यांना सुखी आणि समृद्ध करण्यासाठी जीवापाड श्रम केले. 'भारत कृषक समाज' निर्मितीपासून तर गृहउद्योग, बँका अशा अनेकविध संस्था

PAGE NO.
DATE / /

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊनच निर्माण केल्यात. या लेखसंग्रहाच्या निमित्ताने भाऊसाहेबांच्या सेवाव्रती जीवनाचा व उत्तुंग कर्तृत्वाच्या आकाश भरारीचा एक नजराणा वाचकांसमोर येत आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतीचा सुगंध पसरविणारा हा लेखसंग्रह चाळीस लेखकांच्या लेखणीतून आकाराला आला असला तरी प्रत्येक लेख भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक आगळावेगळा पैलू आहे.

श्री. शिवाजी लोक विद्यापीठाची अभिनव योजना तयार करून भारताचे राष्ट्रपती बाबु डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी उद्घाटन केले. त्या योजनेला त्यावेळी मान्यता मिळाली नाही; परंतु आज 'मुक्त विद्यापीठ' त्याच संकल्पनेचे द्योतक आहे, असे लोक मानतात. कृषी क्रांतीचे जनक व गरिबांचे कैवारी म्हणून प्रा. राम मेघे भाऊसाहेबांचा उल्लेख करतात. तसेच हजारो तरुणांना भाऊसाहेबांनी 'एक नव्या विचारांचे शिल्पकार' म्हणून घडविले असे सार्थ उद्गार काढतात.

PAGE NO.
DATE / /

या आठवणींमधून भाऊसाहेबांचे व्यक्तिमत्त्व हिमालयासारखे, आकाशाला गवसणी घालणारे, गंगेसारखे प्रवाही आणि पवित्र. त्यांची व्यापक महत्त्वाकांक्षा, विशाल अंत:करण, द्रष्टे महापुरुष, सतत प्रयत्नशील, गुणग्राहक वृत्ती, माणसांची पारख, दुर्दम्य आशावाद, जबरदस्त आत्मविश्वास, अचूक निर्णयशक्ती दूरदृष्टी, संघटन कौशल्य, अनन्यसाधारण वैचारिक मानसिकता इत्यादि गुणांचा परिचय होतो. म्हणूनच त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा जनमानसावर उमटतो. नवीन पिढीने त्यातून प्रेरणा घ्यावी अशी इच्छा व्यक्त करते.

भाऊसाहेबांना त्रिवार अभिवादन!

नाव :- कु नंदिनी सुरेंद्र इजनकर
वर्ग :- १२ वी (वाणिज्य)

# उत्कृष्ट पुस्तक परीक्षण व निबंध लेखन तृतीय क्रमांक

## जय सुधाकर गावंडे वर्ग १२ वी (विज्ञान)

तृतीय क्रमांक - 3

Page No. :
Date : / /

संत
गाडगेबाबा
व्यक्ती आणि कार्य

लेखक :- प्रा. डॉ. सौ. उषा वेरूडकर

प्रस्तावना

संत गाडगेबाबा : व्यक्ती आणि कार्य' या प्रबंधास दोन दशकापूर्वी नागपूर विद्यापीठाने डॉ. सौ. उषाताई वेरूडकरांना पीएच्.डी. पदवी देऊन गौरविले. निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या जीवन - कार्याचा वेध घेणाऱ्या त्या प्रबंधाचे ग्रंथरूप वाचकांच्या हाती पडत आहे, याचा मला अतिशय आनंद होत आहे. नौकरी करून घर सांभाळणाऱ्या त्या गृहिणी असल्याने स्वाभाविकच ग्रंथ प्रकाशन कार्यात अडचनी येत गेल्या. बाबांच्या जीवनावरील एक चांगले पुस्तक वाचकांच्या हाती पडायला जरी विलंब झाला तरी योगायोगाने एका पवित्र पर्वावर हा ग्रंथ प्रकाशित होत आहे ही नियतीची योजना असावी.

ते पवित्र पर्व म्हणजे संत गाडगेबाबांच्या गृहत्यागाचे हे शताब्दी वर्ष. सन १९०५ साली बाबांनी लोककल्यानासाठी स्वताच्या प्रपंचावर तुळशीपत्र ठेऊन गृहत्याग केला. ज्या क्षणी त्यांनी गृहत्यागाचा निर्णय घेतला तो क्षण बहुजन समाजाच्या कल्याणाचा असल्याने पवित्र आहे.

Page No. :
Date : / /

सौ. कुंताबाई डेबुजी जानोरकरांना त्यांविशः अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले आणि पतीच्या सहकार्याशिवाय प्रपंचाचा गाडा रेकटीला ओढावा लागला. त्याना जे क्लेश झाले ते त्यांनी मुकाटपणे सोसले हा देखील त्यांचा मोठा त्याग आहे. आणि कोणत्याही संतपत्नीच्या त्यागाकडे दुर्लक्ष करणे कृतघ्नपणाचे ठरेल. नवरा लोकार्पिन केलेल्या स्त्रियांना खडतर जिवनाला सामोरे जावे लागते, आपल्या आशा आकांक्षावर निखारा ठेवावा लागतो पण त्यांच्या या त्यागानेच काळवंडलेला समाज पुन्हा-पुन्हा उजळून निघत असतो. निष्कामि कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या गृहत्याग शताब्दी वर्षात हा ग्रंथ प्रकाशित करण्यात औचित्य साधल्याने डॉ. सौ. उषाताई वैरूडकरांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

संत नामदेव - ज्ञानेश्वर ते राष्ट्रसंत तुकडोजी - गाडगेबाबा हा डोळस भक्तीमार्गी आणि सामाजीक कल्याणाच्या दृष्टीने चैतन्यशील असा काळ आहे. 'ज्ञानाचा एका नि नामाचा तुका' हा जसा एक अमृतयोग तसाच गीतेचा त्यागी नी त्यागींचा बाबा म्हणजे संत गाडगेबाबा हा आधुनिक काळातील समष्टीयोग मानावा लागतो. आचार्य विनोबा भावे म्हणतात, 'गीता काय सांगते जे जाणण्यासाठी गीतापठणापेक्षा फक्त 'गीता' या शब्दाचा वारंवार उच्चार करा. पहिल्या पाच उच्चारानंतर 'गीता' रोवजी

Page No. :
Date : / /

'त्यागी' उच्चार व्हावयास लागतो. गीता त्यागी पुरुष निर्माण करते. असे त्यागी पुरुष आभाळातून पडत नाहीत तर स्वयं प्रेरणेतुन कालप्रवाहात स्वकीयांच्या मातीतून घडत असतात. गीताप्रणीत कर्मयोगाचा प्रत्यक्षातील बावनकशी प्रतिनीधी म्हणजे संत गाडगेबाबा.
आधुनिक काळातील हा संत निर्मोही तसाच अनासक्तीचा अत्युच्च धवलगिरी. या विज्ञानयुगात हिमगिरीला ओलांडणे सहज सोपे झाले असले तरी संत गाडगेबाबांच्या अलौकीक उत्तुंग अशा व्यक्तिमत्वास ओलांडून जाने अशक्य आहे. कोणत्याही प्रकारचे सामाजिक किंवा लोकोत्तर कर्म न करता केवळ कीर्तन-प्रवचनातून गीतेचा कर्मयोग सांगणारी भगवी झुडूपं अलिकडच्या काळात खूप उगवली आहेत. सुखवस्तू लोकांच्या मानसिक दुबळेपनाशी नि सामान्य लोकांच्या भोळ्या भावनांशी लगारीच खेळ मांडून प्रचंड आर्थीक लुट करणाऱ्या या भगव्या झुडूपी जंगलाची नवी समस्या समाजहितैषी लोकांसमोर उभी आहे. वातानुकूलित गाडीने प्रवास करणाऱ्या नि धुळीची ॲलर्जी असणाऱ्या या वाचाळ लोकांनी स्वतःचे शयनगृहही कधी झाडले नसले तरीही अख्खा महाराष्ट्र आपल्या खराट्याने झाडणार, नि कोणत्याही घरची खापरात भाजीभाकरी खाणाऱ्या गाडगेबाबांच्या कार्याशी सर यांना कशी करता येईल?
संत गाडगेबाबांच्या व्यक्तित्व नि कार्याच्या पुन्हा एकदा धांडोळा घेण्याची अपरिहार्यता असताना डॉ. सौ. उषाताई वेरूडकरांनी

Page No. :
Date : / /


या ग्रंथाच्या रूपाने गरज तडिस नेलेली आहे.

प्रगतीशील विचारधारा आणि विज्ञान-निष्ठेची पताका हाती घेऊन बुरसटलेल्या पोथीनिष्ठ कर्मकांडांना लाथाडणारा हा निरक्षर संत उपजत अशी प्रज्ञा प्राप्त झालेला एक प्रज्ञावंत होता.
शिष्याकडून सेवा करून घेणारे नि बदामापिस्ता खाऊन आळसावल्याने कर्म टाकून नैष्कर्म्याच्या गप्पा मारणाऱ्यांना कर्मयोग कळलाच कुठे ?

कर्मयोगाचे मर्म सांगतात डॉ. राधाकृष्णन म्हणतात –

Gita preaches not renunciation of karma but renuciation in karma.

Name:- Jay Sudhakar Gawande
Class :- 12th scince [C].



श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व्दारा संचालित



# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती

## भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपुर्ती मिनत्य
## “संविधान गौरव महोत्सव”
## ३ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी

**सत्र २०२४-२५**

# *** अहवाल ***



प्राचार्य
डॉ. डी.व्ही.हांडे




श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालित

**महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड जि. अमरावती**

पिनकोड – ४४४ ९०६ : दुरध्वनी (०७२२९) २३२०२२

*NAAC Reaccreadited with "B" Grade CGPA 2.24 (IIIrd Cycle) (2021-2026)*

श्री. हर्षवर्धन प्र. देशमुख
अध्यक्ष

डॉ. दिलीप वि. हांडे
प्राचार्य
M.Sc.(Botany), Ph.D., FMSI

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख
संस्थापक अध्यक्ष
M.A., D.Phil., L.L.D., Bar-At-Law

College Code : 104 I Email : mfm1_warud@rediffmail.com I Website : http://mfulecollegewarud.ac.in




जावक क्र. दिनांक :  /  /२०

**प्रति,**

**मा. सहसंचालक कार्यालय,**

**अमरावती विभाग, अमरावती**

**संदर्भ :-** भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपुर्ती निमित्त "संविधान गौरव महोत्सव" या क्रार्यक्रमाचा अहवाल सादर करण्याबाबत.

**महोदय,**

महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनाल्य (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, यांच्या क्र. उशिसं/मवि-१/संविधान गौरव महोत्सव/२०२५/३६५अ. दि. ३ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रानुसार आमच्या महाविद्यालयात "संविधान गौरव महोत्सव" चे आयोजने करण्यात आले. यामध्ये १) निबंध स्पर्धा, २) प्रश्नमजुंषा, ३) व्याख्यान, ४) वकृत्व स्पर्धा, ५) संविधान वाचन, ६) जनजागृती पर रॅली इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाचे छायाचित्र व अहवाल सादर करत आहो. स्वीकार करावा हि विनंती.

**डॉ. डी.व्ही. हांडे**

**अहवाल**

**वकृत्व स्पर्धा दिनांक ०७/०२/२०२५**







शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट राज्य यांच्या दि. ०३ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रान्वये आमच्या महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपुर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सवानिमित्य व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्याक्रमाच्या अध्यक्ष ग्रंथपाल प्रा. सुधाकर घोरपडे तर प्रमुख व्यक्ता डॉ. शुभांगी सोनार राज्यशास्त्र विभाग ह्या होत्या यावेळी मंचावर प्रा. लक्ष्मण पवार, डॉ. नलिनी बोडखे तथा प्रा. साक्षी वाटाणे होत्या कार्यक्रमाचे संचालन प्रा. लक्ष्मण पवार यांनी केले तर आभार डॉ. नलिनी बोडखे यांनी केले या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अहवाल**

**प्रश्न मंजुषा**









शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०३ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रान्वये आमच्या महाविद्यालयात दि. १४/०२/२०२५रोजी प्रश्न मंजुषाया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेत एकुण १८ विद्यार्थी सहभागी झाले. यामध्ये प्रश्न क्रमांक गिरीधर युवनाते बी.ए.भाग २, आयुष माहोरे बी.ए.भाग २, विशाल असारे बी.कॉम भाग २ यांना मिळाला व्दितीय क्रमांक कु. आचल करिये बी.ए. भाग ३, कु. हर्षलता मानेकर बी.कॉम भाग१, कु. डॉली खराळकर बी.एसी भाग १ यांना मिळाला तर तृतीय क्रमांक कु. सानिया शिंदे बी.एस.सी. भाग २, कु. वैष्णवी सराफ बी.कॉम भाग १, व कु. मयुरी कोल्हे बी.कॉम भाग १, यांना मिळाला या स्पर्धेचे परिक्षण प्रा. मोहम्मद अतिक, प्रा. संदिप निकम, प्रा. मंगेश भोंडे यांना केले तर या कार्यक्रमाचे संचालन प्रा. मोहम्मद अतिक यांनी केले.


## अहवाल


## निबंध स्पर्धा

## भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षापुर्ती निमित्य संविधान गौरव महोत्सव









शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०३ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रान्वये आमच्या महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव वेगवेगळया उपक्रमांनी साजरा करण्यात आला त्यापैकी दि. १८/०२/२०२५ रोजी निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकुण २५ विद्यार्थीनी सहभाग नोंदवला त्यापैकी प्रथम क्रमांक नचिकेत उ. पाथरे, व्दितीय क्रमांक कु. दिशा निलकंठ कुकडे तर तृतीय क्रमांक गौरी शेषराव गावंडे यांना मिळाला प्रोत्साहनपर कु. वृषाली शं. परतेती यांना देण्यात आला या निबंध स्पर्धेचे परिक्षण प्रा. लक्ष्मण पवार, डॉ. स्वाती चोरे तथा डॉ. करुणा डहाके यांनी केले.

**अहवाल**

**व्याख्यान**







आमच्या महाविद्यालयात भारतीय राज्य घटनेच्या ७५ वर्षापुर्ती निमित्य संविधानोच गौरव महोत्सव अंतर्गत व्याखनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे चे अध्यक्ष ग्रंथपाल प्रा. सुधाकर घोरपडे सर होते कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ता मा. डॉ. शुभांगी सोनारे होत्या भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समिती पासुन तर भारतीय राज्यघटना अमलात येईपर्यंतचा लेखा जोखा डॉद्य सोनारे यांनी मांडला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विलास हिरणवाळे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. लक्ष्मण पवार यांनी केले तर आभार प्रा. निकम सर यांनी मानले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी हजर होते.

# अहवाल

## रॅली







शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या दि. ०३ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रानुसार आमच्या महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक या रॅलीत सहभागी होते. यावेळी भारतीय राज्यघटना कशी आहे हे ही या रॅलीच्या माध्यमातुन दावण्यात आली ग्राम धनोडी येथे राष्ट्रीय सेवा योजनचे श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. नागरी व आदिवासी भागातुन रॅली काढुन जनजागृती अभियान राबवण्यात आले.

# अहवाल

## संविधान वाचन






भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षापुर्ती निमित्य संविधान गौरव महोत्सव या निमित्याने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महात्मा फुले कला वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड ग्रंथलय विभागाच्या वतीने संविधान वाचन हा उपक्रम राबवण्यात आला.

अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, पाच स्वतंत्र आवृत्त्या

सुविचार
दुःखी व्हा किंवा स्वतःला प्रेरित करा कारण तुमचे ध्येय तुम्हीच निवडलेल आहे.

संपादक- अनिल अग्रवाल

# मातृभूमि
अमरावती

संस्थापक : स्व. ब्रजलालजी बियाणी

90 वर्ष जुनं ते सोनं

मो.9284243442
मो.9422918686

RNI : MAHMAR/2010/35500
Postal. No. ATI/RNP/291/17-19

• शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी २०२५ • किंमत -४.०० रु. • पाने १२

FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI




## महात्मा फुले महाविद्यालय येथे

# कर्मयोगी संत गाडगेबाबा जयंती उत्साहात

**ता.प्रतिनिधी। २७ फेब्रुवारी**

**वरुड** - महात्मा फुले महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संत गाडगेबाबांनी समाजसेवा, शिक्षण आणि स्वच्छतेच्या माध्यमातुन समाजात मोठा परिवर्तन घडवुन आणला. त्यांच्या कार्याचा जागर करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्त गाडगेबाबांच्या दशसुत्रीवर आधारित वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी गाडगेबाबांच्या दससुत्री, स्वच्छता, शिक्षण, अंधश्रद्धा निर्मुलन, व्यसनमुक्ती, स्त्री-पुरुष समानता यांसारख्या विचारांवर आपली मत प्रभावीपणे मांडली. स्पर्धेत एकुण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात प्रथम स्वयंसेवक जयकुमार तायवाडे, द्वितीय स्वयंसेविका आचल करीये तर तृतीय क्रमांक सोनिया शिंदे हिने पटकाविला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागचे प्राध्यापक लक्ष्मण पवार होते तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी विलास हिरणवाळे तर उपस्थितांचे आभार मोहम्मद अतिक यांनी मानले. प्राध्यापक आम्रपाली पाटील, मोहम्मद अतिक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संत गाडगेबाबांच्या समाजसेवेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवुन दिले आणि त्यांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

स्पर्धेनंतर समाजप्रबोधन आणि जनजागृती करण्याच्या उद्देशाने रॅली काढण्यात आली. या रॅलीत स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी स्वच्छता हीच सेवा, अंधश्रद्धा हटवा, समाज घडवा, व्यसनमुक्त जीवन हेच उत्तम जीवन या सारखे घोषवाक्य देत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण केली.

कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहात केले. या उपक्रमाद्वारे संत गाडगेबाबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यात आला आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत समाजसेवा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

